Scan QR code to visit ... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १६७ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१७ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit ... Epaper Portal

# लोकसभा निवडणूकीच्या तारखा जाहिर

## मतमोजणी ४ जून २०२४

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–अखेर केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणूक २०२४ च्या तारखा जाहीर केल्या आहेत. आज दुपारी ३ वाजता दिल्लीतील विज्ञान भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणुक आयुक्त ग्यानेश कुमार, सुखदेवसिंग संधु यांनी लोकसभा निवडणुकीविषयी माहिती दिली. देशात सात टप्प्यांमध्ये मतदान होणार असून महाराष्ट्रात ५ टप्प्यात प्रक्रिया पार पडणार आहे. देशातील मतदान प्रक्रिया १९ एप्रिल ते १ जुनपर्यंत चालणार आहेत. सर्व सात टप्पे पुर्ण झाल्यानंतर ४ जून २०२४ रोजी मतमोजणी होणार असल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले.

| पहिला टप्पा | दुसरा टप्पा | तिसरा टप्पा | चौथा टप्पा |
|---|---|---|---|
| १९ एप्रिल २०२४ | २६ एप्रिल २०२४ | ७ मे २०२४ | १३ मे २०२४ |

| पाचवा टप्पा | सहावा टप्पा | सातवा टप्पा |
|---|---|---|
| २० मे २०२४ | २५ मे २०२४ | १ जुन २०२४ |

## आजपासून आचारसंहिता लागू

### लोकसभेसोबत महाराष्ट्रात विधानसभेचीही पोटनिवडणूक

# केंद्रीय निवडणूक आयोगाची घोषणा निकाल मात्र, ४ जून रोजीच लागणार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) –देशातील लोकसभा निवडणुकी बरोबरच महाराष्ट्रातील विधानसभेच्या पोटनिवडणुकीची घोषणा देखील निवडणूक आयोगाने केली आहे. अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक होणार आहे. या मतदारसंघाचे आमदार गोवर्धन शर्मा यांचे निधन झाले होते. त्यामुळे ही जागा रिक्त होती. आता या विधानसभा लोकसभा मतदारसंघावर २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे, तर या मतदारसंघाचा निकाल हा ४ जून रोजी लागणार आहे. देशभरात लोकसभा निवडणुका असल्याने या मतदारसंघातील विधानसभेचा निकाल देखील देशभरातील लोकसभेच्या निकालासोबतच लावण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे.

आमदार गोवर्धन शर्मा यांचा निधन झाले होते. त्यामुळे अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील रिक्त जागेवर पोटनिवडणूक कधी लागणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. मात्र, आता निवडणूक आयोगाच्या वतीने देशभरातील सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली. या घोषणेबरोबरच अकोला पश्चिम या विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीची देखील घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेमध्ये याची घोषणा केली. देशभरामध्ये सात टप्प्यामध्ये निवडणुका पार पडणार असून त्यातील पाच टप्प्यात महाराष्ट्रातील लोकसभेच्या निवडणुका पार पडणार आहे. या सर्व निवडणुकींचा निकाल हा चार जून रोजी घोषित होणार आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ च्या तारखा अखेर जाहीर झाल्या आहेत. लोकसभा मुख्य आयुक्त राजीव कुमार आणि आयुक्त सुखविंदर संधू, ज्ञानेश कुमार यांनी माहिती दिली. दरम्यान, देशभरात सात टप्प्यात हे मतदान होणार असून महाराष्ट्रात ५ टप्प्यात मतदान होणार आहे. १९ एप्रिल पहिला, २६ एप्रिल दुसरा, ७ मे तिसरा, १३ मे चौथा अन् २० मे रोजी ५ व्या टप्प्याचे महाराष्ट्रात मतदान होईल.



# खासदार उदयनराजे नाराज?:माझ्याकडे विमान अन् रेल्वेचे तिकीट, इतर तिकीटाचे मला काहीच माहिती नाही

**सातारा**–माझ्याकडे विमान, रेल्वे, पिक्चर आणि बसचे तिकीट आहे. पण इतर तिकिटाचे मला काहीही माहिती नाही. मी अद्याप राजकीय संन्यास घेतला नाही, असे सूचक विधान भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी शनिवारी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उदयनराजे एखादी वेगळी वाट निवडणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

भाजपने लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची दुसरी यादी नुकतीच जारी केली. पण त्यात उदयनराजे भोसले यांचे नाव नाही. यामुळे उदयनराजे यांच्या समर्थकांत नाराजी पसरली आहे. या प्रकरणी योग्य तो निर्णय झाला नाही तर आम्ही एकमताने निर्णय घेऊ, असा इशारा त्यांनी दिला आहे. काही कार्यकर्त्यांनी या प्रकरणी राजीनामे देण्याचाही निर्धार केला आहे. त्यातच आता स्वतः उदयनराजे यांनी शनिवारी सूचक प्रतिक्रिया देत आपली नाराजी वरिष्ठांच्या कानावर घालण्याचा प्रयत्न केला आहे.उदयनराजे भोसले शनिवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, माझ्याकडे तिकीट आहे, विमानाचे तिकीट आहे, रेल्वेचे तिकीट आहे, तसेच पिक्चरचेही आहे. पण इतर तिकिटाचे मला काहीही माहिती नाही. महायुतीमध्ये ३ पक्ष एकत्र आलेत. प्रत्येकाला आपल्याला उमेदवारी मिळावे असे वाटते. ते रास्तही असते. त्यात चुकीचे काहीच नाही. पण मी काही संन्यास घेणार नाही.उदयनराजे



भोसले यांच्या विधानामुळे ते आगामी सार्वत्रिक निवडणुकांत एखादा वेगळा मार्ग निवडणार काय? अशी चर्चा रंगली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने सातारा लोकसभा मतदार संघावर दावा ठोकला आहे. याठिकाणी रामराजे निंबाळकर यांच्या उमेदवाराची चर्चा आहे. त्यामुळे ही जागा राष्ट्रवादीला सुटली तर उदयनराजे यांचा पत्ता आपसूकच कट होणार आहे? त्यामुळे गत काही दिवसांपासून उदयनराजे यांनी भाजपपासून अंतर राखण्याचा प्रयत्न केल्याचा दावा केला जात आहे.दुसरीकडे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे नुकतेच सातारा दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात त्यांनी उदयनराजे भोसले यांच्या उमेदवारीविषयी कोणतेही ठोस भाष्य केले नव्हते. त्यामुळेही भोसले यांच्या कार्यकर्त्यांत नाराजी पसरली आहे. त्यांनी या प्रकरणी भाजप जिल्हाध्यक्षांना घेराव घालून जाब विचारला होता.

### पुढील ३ तीन दिवस पूर्व विदर्भात पावसाचा अंदाज

# मराठवाड्यातही हलक्या पावसाची शक्यता, विदर्भातील काही जिल्ह्यांत गारपीटीचाही इशारा

**पुणे**–राज्याच्या कमाल आणि किमान तापमानात चढ–उतार सुरू असल्याने पहाटे गारठा तर दुपारी उन्हाचा चटका अशीच स्थिती अनुभवायला मिळत आहे. यातच आता राज्यात पावसाला पोषक हवामान तयार झाले आहे. त्यामुळे आजपासून पुढील तीन दिवस पूर्व विदर्भासह मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तर उर्वरित राज्याच्या कमाल, किमान तापमानात चढ–उतार सुरूच राहणार आहे. उत्तर ओडिशा आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. त्यापासून पूर्व विदर्भापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. तर मराठवाड्यापासून कर्नाटक, तामिळनाडू ते कोमोरिन भागापर्यंत आणखी एक हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. यामुळे राज्यात पावसाचा पोषक हवामान तयार झाल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे.दरम्यान, हवामान विभागाने शनिवारी विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, नागपूर या जिल्ह्यांमध्ये विजा आणि ढगांच्या गडगडाटासह काही ठिकाणी हलक्या पावसाचा यलो अलर्ट दिला. तर भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यात यावेळी ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारेही वाहू शकते, असाही अंदाज देण्यात आला.तर उद्या म्हणजेच रविवारी अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यात विजा आणि ढगांच्या गडगडाटासह काही ठिकाणी हलक्या पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला. तर रविवारी यवतमाळ, गोंदीया, चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी गारपीटीची शक्यताही असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.तर सोमवारी अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये विजा आणि ढगांच्या गडगडाटासह काही ठिकाणी हलक्या पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागाने दिला. तर सोमवारी पावसासह चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, नागपूर जिल्ह्यांमधील काही भागांमध्ये गारपीटीचीही शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.दरम्यान, मंगळवारी विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, नागपूर, वर्धा या जिल्ह्यांधील काही भागात पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. तर मराठवड्यातील हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यातही काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.

# आघाडीचा मोठा नेता सोमवारी महायुतीत–संजय शिरसाट

### छत्रपती संभाजीनगरच्या उमेदवारीवरही 'सिक्रेट पवित्रा'



**छत्रपती संभाजीनगर**–छत्रपती संभाजीनगर मध्ये लोकसभेसाठी भाजपचा नाही तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा उमेदवार असेल. मात्र, त्या उमेदवाराचे नाव अद्याप जाहीर करणार नाही. ते सोमवारी तुम्हाला कळेल, अशा शब्दात संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर लोकसभा संघांमधील सस्पेन्स वाढवला आहे. सोमवारी महाआघाडीमधील एक मोठा नेता महायुतीमध्ये सामील होणार असल्याचा दावा देखील संजय शिरसाट यांनी केला आहे. छत्रपती संभाजीनगर मध्ये उद्धव ठाकरे गटात चंद्रकांत खैरे विरुद्ध विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या आरोप प्रत्यारोप सुरू असताना, संजय शिरसाट यांनी केलेल्या वक्तव्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातून अंबादास दानवे हे लोकसभेसाठी इच्छुक आहेत. तर दुसरीकडे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी देखील लोकसभा लढवण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र खैरी यांनी लोकसभेचे तयारी करताना केलेल्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनाला विरोधी पक्षनेते अंबादास झाले हे अनुपस्थित होते. त्यामुळे त्यांच्या नाराजीची चर्चा सध्या राजकारणात सुरू आहे. त्यातच संजय शिरसाट यांनी एक मोठा नेता लवकरच महायुतीमध्ये येणार असल्याचा दावा केला आहे. सोमवारी त्या नेत्याचा पक्षप्रवेश होणार असल्याचे देखील संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. यावर महाविकास आघाडी मध्ये मोठा भूकंप येणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.अंबादास दानवे तुमच्या संपर्कात आहेत का? त्यांच्याशी काही बोलणे सुरू आहे का? असा प्रश्न देखील पत्रकारांनी आमदार संजय शिरसाट यांना विचारला. यावर सध्या काहीही बोलण्यास संजय शिरसाट यांनी नकार दिला. मात्र सोमवारी तुम्हाला सर्व चित्र स्पष्ट होणार असल्याचे त्यांनी सांगितले. महायुतीमध्ये लोकसभा लढवण्यासाठी चार नेते इच्छुक असल्याची माहिती देखील त्यांनी दिली. यामध्ये संदिपान भुमरे यांच्या व्यतिरिक्त राजेंद्र जंजाळ यांच्या नावाचा देखील समावेश आहे. मात्र इतर दोन नावे गुप्त असून वेळ आल्यावर त्यांची नावे देखील जाहीर होण्याची शक्यता असल्याचे संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

# राज्यातील ऑटो आणि टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना

## ना. सुधीर मुनगंटीवार यांचा निर्धार राज्य सरकारने केला पूर्ण!

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लाखो ऑटो रिक्षा, मिटर्ड टॅक्सी चालकांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला असून त्यांच्यासाठी महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला ; विशेष म्हणजे ९ मार्च २०१८ च्या अर्थासंकल्पीय भाषणात ना. सुधीर मुनगंटीवार हे अर्थमंत्री असताना त्यांनीच हा विषय प्रामुख्याने मांडलाहोता आणि ऑटो आणि टॅक्सी चालकांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळावा, कौटुंबिक सुरक्षा लाभावी या दृष्टीने पावले उचलण्याची सूचना केली होती. ना सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराला मिळालेले हे मोठे यश असून मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार यांचे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आभार मानले आहेत. महाराष्ट्रातील ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी यांची नोंदणी बॅज वितरण, निरीक्षण तपासणी व कर भरणा परिवहन खात्याबाबत करण्यात येतो; त्यामुळे ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सीचालकांची अद्ययावत संपूर्ण माहिती परिवहन विभागाकडे उपलब्ध असते. त्यामुळे परिवहन विभागाअंतर्गत ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यास तसेच सदर मंडळ स्वायत्त व स्वयंपूर्ण व्हावे,

**अर्थमंत्री असताना २०१८ च्या अधिवेशनात घेतला होता निर्णय**

यासाठी निधीचा स्त्रोत निर्माण करण्यास व शासनाकडून एक वेळचे अनुदान रुपये ५० कोटी तात्काळ उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आज मंत्रिमंडळ बैठकीत शासनाच्या मंजुरीसाठी मंडण्यात आला होता व त्याला मंजुरी प्रदान करण्यात आली.ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या कामकाजासाठी



महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील वर्ग एक संवर्गातील अधिकारी मुख्याधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय देखील बैठकीत घेण्यात आला. सदर महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाचे गठन झाल्यानंतर या मंडळामार्फत ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालकांना केंद्र शासनामार्फत व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या महत्वपूर्ण योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.सदर मंडळाच्या कामकाजाबाचे नियम आणि नियमावली परिवहन आयुक्त यांच्याकडून तयार करण्यात येणार असून महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याण मंडळाचे स्वीय प्रपंजी खाते (पिएलए ) उघडण्यास तसेच सदर मंडळ सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणी करण्यास मान्यता देण्याचे बैठकीत ठरले. राज्यात नोंदणी झालेल्या ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी या वाहनांकडून तीनशे रुपये प्रति वर्ष कल्याणकारी निधी म्हणून जमा करण्यात येणार असून यासाठी १९५८ मध्ये सुधारणा करून नव्याने अधिकार वसूल करण्याबाबतची तरतूद समाविष्ट करत या कमी स्थापन केलेल्या खात्यामध्ये जमा करण्यास मान्यता देण्यात आली. ना सुधीर मुनगंटीवार यांनी सन २०१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाषण करताना, राज्यामध्ये ऑटो रिक्षा चालकांची संख्या जवळपास वीस लाखांपर्यंत आहे असा उल्लेख करत त्यांच्या विविध अडचणी मांडण्यासाठी पण निराकरणासाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळावे असा उल्लेख करून महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा चालक कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा मानस असल्याचे सभागृहात सांगितले होते. यासाठी सन २०१८–१९ मध्ये पाच कोटी रुपये इतका नियत व राखून ठेवण्यात येत असल्याचेही त्यांनी घोषित केले होते. ऑटो रिक्षा चालक, मीटर टॅक्सी चालक यांच्यासाठी ना सुधीर मुनगंटीवार यांची भावना विद्यमान सरकारने ओळखून मोठा निर्णय आज घोषित केल्यामुळे ना सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

सह्याद्रीचा राखणदार



# शेतकऱ्यांनो सत्तापीपासून सावध व्हा! नाहीतर आत्महत्या शिवाय पर्याय नाही..

भारतासारख्या कृषिप्रधान देशात जय जवान जय किसान हा नारा केवळ कागदा पुरताच मर्यादित राहिला आहे. सरकार शेतमालाला भाव देत नाही, त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतो आहे, तर सीमेवर जवान गोळ्या छातीवर घेऊन मरतो आहे. पण याबाबतची गांभीर्य आपण निवडून दिलेल्या कोणत्याही लोकप्रतिनिधी किंवा सरकारला नाही. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत शेतकऱ्यांनी मताची दान न करता मत कुणाला द्यायचे, याचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. नाहीतर शेतकऱ्यांना आत्महत्या पासून कोणीच रोखू शकणार नाही, हे मात्र निश्चित.



**शेषराव राऊत**
चिमूर तालुका
ग्रामीण वार्तापत्र

चिमूर लोकसभा मतदार संघाने अनेक खासदार निवडून दिले. परंतु या क्षेत्रामध्ये बहुसंख्य मजूर वर्ग आदिवासी शेतकरी यासाठी कोणत्याच लोकप्रतिनिधीने या ७५ वर्षांमध्ये कोणत्याही प्रकारची विकासात्मक कार्य केलेले नाही. किंवा लोकसभेमध्ये प्रश्नही मांडले नाहीत. त्यामुळे आजही या वर्गाची स्थिती या ७५ वर्षानंतरही फारशी सुधारलेली दिसत नाही. तरी येतील आदिवासी, मजूर, शेतकरी, आपल्यावर अन्याय होत असल्याची यांना जाणीव केव्हा होईल. हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

या क्षेत्रामध्ये साधा पंचायत समिती सदस्य निवडून आलेला हजारोच्या घरात संपत्ती असलेल्या कुटुंबातील व्यक्ती अवघ्या पाच वर्षांमध्ये करोडपती होतो, चार चाकी वाहनाने घुमतो, परंतु शेतकरी आणि गरीब आदिवासींची उन्नती का होत नाही, हा प्रश्न अजून पर्यंत तरी सुटलेला नाही. कारण याची गांभीर्य कोणी लक्षातच घेत नाही. या लोकांना निवडणूक आल्या की सणासारखे वाटते. हे राजकीय लोक यांच्यासमोर मटन आणि दारूची नीप दिली की हे खुश होता. आणि त्यामध्येच यांचं समाधान असते. परंतु एकदा निवडून आल्यावर हे लोक प्रतिनिधी पाच वर्ष त्यांचे तोंडही पाहत नाही, हे सर्वजण विसरून जातात. त्यामुळेच त्याच्या गरिबीचा फायदा घेणारी हे करोडपती बनले, ही वस्तुस्थिती आहे.


हा मूळ प्रश्न बाजूला ठेवून आज लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर चिमूर क्षेत्रामध्ये भाजप आणि काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेशा संबंधात रोज बातम्या पाहायला मिळतात. मग हे पक्ष प्रवेश करणारी कोण आहेत, याचा सामान्य जनतेला विसर पडलेला आहे. हे कोणत्याच पक्षाचे निष्ठावंत नाही. हे संधी साधू आहेत. हे सामान्य जनतेला केव्हा कळणार असा प्रश्न उपस्थित होतो. असे कितीतरी गाव पातळीवरचे नेते असे आहे कि, या मुख्य राजकीय नेत्यांच्या मागे लागून काही भले होणार नाही, हे माहीत असतानाही गावातील राजकारण डोळ्यासमोर ठेवून पक्ष प्रवेश करतात. त्यातूनच त्यांचा व गावाचा विकास खुंटतो, पण यांना गावाच्या विकासा सोबतही अंध भक्तीमुळे काही घेणे देणे नसल्याचं निदर्शनास येत आहे. आता लोकसभा निवडणूक तोंडावर आली असताना, येथील भाजपा प्रतिनिधींनी प्रत्येक समाजासाठी व त्यांच्या देवस्थानासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देऊन भूमिपूजनाचा जणू काही सपाटच सुरू केला असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. परंतु क्षेत्रातील जनता यावर्षीच्या मोठ्या दुष्काळी परिस्थिती चा सामना असताना, किंवा हाताला काम नसताना, शेतकऱ्याच्या मालाला आज २४ वर्षा पासून असलेला भाव मिळत असताना, जनता महागाईपासून त्रस्त असताना व शेतकरी क्षेत्रांमध्ये आत्महत्या करीत असताना, समाज मंदिरे बांधून कोणता विकास साधायचा आहे. हे सर्वसामान्य जनतेला कळत नाही आणि त्यामुळेच '' मंदिराचा विकास हाच आपला विकास असे समजून ही भोळी जनता भाजपामध्ये मोठ्या संख्येने प्रवेश करताना दिसत आहे. याने खरंच समाजाचा विकास होणार का हा प्रश्न निर्माण होतो आहे. त्यामुळे आज शेतकऱ्यांनी कोणत्याही राजकीय पक्षाचा अजेंडा मान्य न करता शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतमालाला एम एस पी नुसार भाव, व त्याची गॅरंटी, स्वस्त दरात बी बियाणे, खते, बोगस खताच्या कंपन्यांवर कारवाई इत्यादी मागण्या लिखित स्वरूपात जो पक्ष देईल, त्यांनाच मत द्यावेत. पण फुकट मध्ये मताचे दान करून आपल्याच पायावर धोंडा मारून घेऊ नये, तरच शेतकरी जगेल.



## आदिवासी समाजसेविका!

अनुताई बालकृष्ण वाघ या आदिवासी समाजासाठी काम करणाऱ्या समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ होत्या. त्यांनी शिक्षणाद्वारे आदिवासींच्या जीवनात जागृती निर्माण करण्याचे काम केले. पालघर जिल्ह्यातील कोसबाड येथे ताराबाई मोडक यांचेसोबत त्यांनी बालशिक्षणाचे कार्य केले.

भारताच्या केंद्र सरकारतर्फे साक्षरता प्रसारार्थ अनुताईंनी लिहिलेल्या सहजशिक्षण या पुस्तकास इ.स. १९८१ साली राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले होते. आदिवासींच्या शिक्षणासाठी अनेक संस्था स्थापन करून आयुष्य वेचणाऱ्या या अनुताईंना आदर्श शिक्षिका, दलितमित्र, आदर्श माता, फाय फाऊंडेशन, सावित्रीबाई फुले, बाल कल्याण राष्ट्रीय पुरस्कार, जमनालाल बजाज पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांबरोबरच पद्मश्रीने सन्मानित केले गेले. अनुताई वाघ यांनी लिहिलेली ग्रंथसंपदा- कोसबाडच्या टेकडीवरून (आत्मचरित्र), दाभोणच्या जंगलातून शिक्षणविषयक ग्रंथ (अनेक), सईची सोबत (कथासंग्रह), सहजशिक्षण इत्यादी आहे.



**श्री कृष्णकुमार आनंदी- गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु.पो.ता.जि.गडचिरोली**
**दूरभाष- ७७७५०४१०८६.**

अनुताईंचा जन्म मोरगाव, पुणे येथे दि.१७ मार्च १९१० रोजी झाला. त्यांचे वडील बालकृष्ण वाघ हे सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरीस होते. वयाच्या तेराव्या वर्षी इ.स.१९२३ साली शंकर वामन जातेगावकर यांच्याशी अनुताईंचा विवाह झाला. परंतु सहा महिन्यांतच त्यांना वयाच्या तेराव्या वर्षी वैधव्य आले. असे असूनसुद्धा तत्कालीन सामाजिक रूढींचे बंधन झुगारून त्यांनी शिक्षण घेतले व शिक्षिका म्हणून काम करीत असताना त्यांना ताराबाई मोडक भेटल्या आणि त्यांनी ताराबाईंच्या बोर्डी, ठाणे येथे आदिवासींसाठी असलेल्या ग्राम बाल शिक्षण केंद्रात प्रवेश केला व तेथे इ.स.१९४७ ते १९९२ अशी ४७ वर्षे त्यांनी निरपेक्ष वृत्तीने ग्रामशिक्षणाचे कार्य चालवले. पुढे कोसबाडच्या नूतन बाल शिक्षण केंद्राच्या चालक, राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकरिणी सदस्य, अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांचे शिक्षणविषयक ग्रंथ इंग्रजी, हिंदी, गुजराथीतून अनुवादित झाले. प्रबोधनासाठी वाहिलेल्या शिक्षणपत्रिका व स्त्रीजागृतीसाठी असलेल्या सावित्री मासिकाच्या त्या संपादिका होत्या. कोसबाडच्या टेकडीवर आदिवासींच्या उन्नतीसाठी एक संस्था स्थापन केली. या संस्थेलाच कोसबाड प्रकल्प म्हणून ओळखले जाते. आदिवासींच्या शिक्षणासाठी पाळणाघरे, बालवाड्या, प्राथमिक शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालसेविका ट्रेनिंग कॉलेज इ.शैक्षणिक संस्था सुरू केल्या. त्यांचे दि.२७ सप्टेंबर १९९२ रोजी कोसबाड येथे दुःखद निधन झाले.

!! अनुताई वाघ यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!

## हळदविधी की उधळपट्टी !

विवाह संस्काराचा प्रारंभ मुलास हळद लावण्याने होतो. त्याची आई, बहिण व नात्यातील बायका त्याला सुगंधी तेलात भिजविलेली हळद लावतात. ह्या रंगतदार समारंभात हळदीची गाणी आणि वाजंत्री यासह मुलास समारंभपूर्वक आंघोळ घालतात. उर्वरित म्हणजे उष्टी हळद, साडी आणि पूजा साहित्यासह, वधूगृही नेतात. वरपक्षाकडे ज्याप्रमाणे हळदीचा कार्यक्रम झालेला असतो त्याचीच वधूकडे पुनरावृत्ती करतात. वधूला हळद लावतांना नारळ व पाच मूठभर तांदळांनी तिची समारंभपूर्वक ओटी भरतात. हळद लावल्यावर मुला-मुलीस नवरदेव-नवरी असे संबोधिले जाते. आजकाल ग्रामीण भागात होणाऱ्या लग्नांमध्ये एक नवीन विधी उदयास आला आहे, तो म्हणजे हळदी विधी. हळदी समारंभात हजारो रुपये खर्च करून विशेष सजावट केली जाते, त्या दिवशी वधू किंवा वर विशेष पिवळे कपडे घालतात. २०२० पूर्वी या हळदी विधीची प्रथा ग्रामीण भागात कुठेही दिसून येत नव्हती, मात्र गेल्या दोन-तीन वर्षात ग्रामीण भागात ही प्रथा झपाट्याने वाढली आहे.



पूर्वी हळदी विधीच्या मागे कोणताही दिखावा नव्हता, उलट त्यामागे तर्क होता. पूर्वी ग्रामीण भागात आजच्यासारखे साबण आणि शॉम्पू नव्हते, ब्युटी पार्लरही नव्हते. त्यामुळे वधू-वरांच्या चेहऱ्यावरील आणि शरीरावरील मृत त्वचा आणि केस हळदीच्या पेस्टने रगडून काढण्यासाठी आणि चेहरा मुलायम आणि चमकदार करण्यासाठी हळद, चंदन, मैदा आणि दुधापासून तयार केलेल्या पेस्टचा वापर केला जातो. जेणेकरून वधू-वर सुंदर दिसतील. या कामाची जबाबदारी कुटुंबातील महिलांची होती, पण आजकाल हळदीचा विधी बदललेला, दिखाऊ आणि महाग झाला आहे. ज्यामध्ये हजारो रुपये खर्चून सजावट केली जाते. महागडे पिवळे कपडे घातले जातात, वर वधूच्या घरी जातो आणि संपूर्ण वातावरण आणि कार्यक्रम पितांबरी करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जातो. हे पिवळे नाटक घरच्या प्रमुखांच्या कपाळावर तणावाच्या रेषा काढते, ज्यामुळे चिंताग्रस्त घामाचे थेंब पडतात.जुन्याकाळी वधू-वर कच्च्या छपराखाली कसलाही गाजावाजा न करता भक्कम इराद्याने आपले जीवन आनंदाने सुरू करायचे, पण आज भक्कम हेतू कमी आणि ढोंग आणि कृत्रिमता जास्त आहे. आजकाल ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या कुटुंबातील मुलेही या शहरी कृत्रिमतेत अडकून कुटुंबावर अतिरिक्त आर्थिक बोजा वाढवत असल्याचे दिसून येत आहे. कारण त्यांना त्यांची ताकद त्यांच्या उदार मतवादी नेत्यांना, वन साईड हेअर कटिंगवाले किंवा लांब केस असलेल्या सिगारेट ओढणारे मित्रांना आपले शोऑफ दाखवायचे असते. इन्स्टाग्राम, फेसबुक इत्यादीसाठी रील बनवायची आहे. मुलाच्या रील बनविण्याच्या नादात वडिलांची कर्ज फेडण्यातच रील ऐवजी रेल बनून जात असते.ग्रामीण भागात अशा घरांमध्ये फालतू खर्चावर पाण्यासारखा पैसा वाया जातो. ज्यांच्या आई-वडिलांनी एक-एक पैसा कमावून घराची रचना केली, पण ही तरुण मुले-मुली समजून न घेता पालकांच्या विरोधात जाऊन विनाकारण खर्च करतात. ज्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही अशा मुलांनी त्यांच्या पालकांकडे आग्रह धरू नये आणि त्यांना अनावश्यक खर्च करायला लावू नये. आजकाल अनेक ठिकाणी असेही पाहायला मिळते की ज्यांचे लग्न आहे अशी मुलं ते त्यांच्या पालकांना सांगतात की, तुम्हाला काहीच कळत नाही, तुम्हाला समज नाही, तुमची विचारसरणी तशीच जुनी अशिक्षित राहणार आहे, तुम्ही असंस्कृत आहात असे म्हणत ते आपल्या आई-वडिलांना गवांर आणि मागासलेले म्हणतात. जेव्हा जेव्हा मी असे ऐकतो तेव्हा मला विचार करण्यास भाग पाडले जाते आणि माझे पाय अस्थिर होतात. माझे तरुण आणि धाकटे बंधू-भगिनी कोणत्या दिशेने जात आहेत, याची मला खूप काळजी वाटते. अशा फालतू कर्मकांडाला आळा बसल्याच्या बातम्या वाचून आनंद होतोच, पण लोक आपल्या घरात, कुटुंबात, समाजात, गावात अशा कार्यक्रमात सहभागी होऊन, त्यांचे फोटो क्लिक करून स्टेटस पोस्ट करून आनंद घेत आहेत.

**प्रविण बागडे,नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## वरोरा उपविभागात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने वरोरा उपविभागात, उपविभागीय अधिकारी तथा मतदान नोंदणी अधिकारी शिवनंदा लंगडापुरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व क्षेत्रीय अधिकारी, पोलीस, एफ.एस.टी., एस.एस.टी., व्ही.व्ही.टी., व्ही.एस.टी. तसेच विविध समित्यांचे नोडल अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक वरोरा येथील तहसील कार्यालयात नुकतीच घेण्यात आली.



या बैठकीत वरील सर्व अधिकारी व समितीतील सदस्यांना समितीचे कार्य व करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी तथा मतदान नोंदणी अधिकारी श्रीमती लंगडापुरे यांनी सर्व समित्यांचे नोडल अधिकारी, भरारी पथकांचे प्रमुख, सहाय्यक कर्मचारी यांची आढावा बैठक घेऊन मार्गदर्शन केले. या बैठकीत सर्व समित्यांच्या नोडल अधिकाऱ्यांनी आत्तापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला व आगामी काळातील आवश्यक बाबींची पूर्वतयारी करण्याबाबत विचारणा केली. तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना व जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त आदेशांच्या तात्काळ अंमलबजावणीचे आदेशही सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आले.बैठकीला उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे यांच्यासह वरोराचे तहसीलदार योगेश कोटकर, गटविकास अधिकारी गजानन मुंडकर, तालुका कृषी अधिकारी सुशांत लव्हटे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गजानन भोयर, नायब तहसीलदार मधुकर काळे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी व सर्व नोडल समिती सदस्य उपस्थित होते.

## लोकमान्य महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. हेडगेवार रक्तपेढी, नागपूर आणि युवाशक्ती विचार मंच, वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ मार्च रोज शनिवारला रक्तदान शिबिराचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले.




रक्तदान शिबिराच्या सुरुवातीला छोटेखानी उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. जयश्री शास्त्री या होत्या. तर उद्घाटक म्हणून युवाशक्ती विचार मंचचे गणेश नक्षिणे हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे डॉ. रणदिवे होते. नक्षीने यांनी शिबिराचे उद्घाटन करून रक्तदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. रणदिवे यांनी रक्तदानाचे फायदे या विषयावर मार्गदर्शन केले. या रक्तदान शिबिराला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि युवाशक्ती विचार मंचचे कार्यकर्ते यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. या शिबिरात प्रत्येक रक्तदात्याला रक्तदान केल्याबद्दल सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले.या कार्यक्रमाचे संचालन डॉ. रवींद्र शेंडे यांनी केले. तर आभार डॉ. तानाजी माने(कार्यक्रम अधिकारी,राष्ट्रीय सेवा योजना, लोकमान्य महाविद्यालय,वरोरा) यांनी केले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, रा.स.योजनेचे स्वयंसेवक,युवा शक्ती विचार मंचचे पदाधिकारी आणि डॉ. हेडगेवार रक्तपेढी, नागपूरचे इंगळे व कर्मचारी, इत्यादींची मदत मिळाली.

### १८ मार्च रोजी रक्तदान शिबिर

## सेंट्रल रेल्वे मजदूर संघ, शाखा वरोरा यांच्या वतीने आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

सेंट्रल रेल्वे मजदूर संघ शाखा वरोरा यांच्या वतीने सोमवार, दिनांक १८ मार्च २०२४ रोजी वरोरा रेल्वे हॉस्पिटल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

संघाच्या वतीने अध्यक्ष राकेश कुमार यांनी सांगितले की, 'रक्तदान, महादान ' आहे. रक्ताच्या कमतरतेमुळे कुणाचाही जीव जाणार नाही, या उद्देशाने वरोरा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान शिबिराचे उद्घाटन सकाळी ९.०० वाजता होणार असून शिबिर सकाळी ९.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. स्वेच्छेने रक्तदान करण्यासाठी इच्छुकांनी संघाशी संपर्क साधावा. शिबिराच्या यशस्वितेसाठी जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन सेंट्रल रेल्वे मजदूर संघ शाखा वरोरा अध्यक्ष राकेश कुमार, कार्याध्यक्ष विनोद कुमार, सचिव बी.के. भुयान, कोषाध्यक्ष आशिष हरणे आदींनी केले आहे.

## चंद्रपूर भाजपा महानगर विविध आघाडी, प्रकोष्ठ, सेल प्रमुखांची नावे जाहीर-जिल्हाध्यक्ष राहूल पावडे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भाजपा जिल्हाध्यक्ष चंद्रपूर राहूल पावडे यांनी नवनियुक्त आघाडी, प्रकोष्ठ, सेल प्रमुखांची नावे जाहीर केली आहे. भाजपा जिल्हा चंद्रपूर महानगर, आघाडी प्रमुख,प्रकोष्ठ प्रमुख, सेल संयोजक यांचा यात समावेश आहे.

भाजपा जिल्हा चंद्रपूर महानगर कामगार आघाडीच्या महानगर अध्यक्षपदी सुरज सिंग तर उत्तर भारतीय आघाडीच्या महानगर अध्यक्षपदी रुद्रनारायण तिवारी,व्यापारी आघाडीच्या अध्यक्षपदी रामकिशोर सारडा, उद्योग आघाडी अध्यक्षपदी सुबोध कासुलकर , क्रीडा प्रकोष्ठ आघाडीच्या अध्यक्षपदी रोशन भुजाडे,शिक्षण आघाडीचे अध्यक्षपदी अनिल देरकर,दक्षिण भारतीय आघाडीचे अध्यक्षपदी सुरज सरदम,विधी प्रकोष्ठच्या अध्यक्षपदी अँड.किरण पाल,ज्येष्ठ नागरिक प्रकोष्ठच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर गन्नूरवार , आध्यात्मिक प्रकोष्ठच्या अध्यक्षपदी डॉ. शैलेंद्र शुक्ला , पदवीधर प्रकोष्ठच्या अध्यक्षपदी अरुण राहंगडाले , राजस्थान प्रकोष्ठच्या अध्यक्षपदी हेमंतराज सिंघवी , माजी सैनिक प्रकोष्ठच्या अध्यक्षपदी हरीश गाडे , सेवाभावी प्रकोष्ठच्या अध्यक्षपदी आशिष मुंधडा वैद्यकीय सेलच्या अध्यक्षपदी डॉ. गिरीधर येडे, सांस्कृतिक सेलच्या अध्यक्षपदी जगदीश नंदुरकर बंगाली समाज सेलच्या अध्यक्षपदी चंदन पाल,आत्मनिर्भर भारत सेलच्या संयोजक पदी मनीषा महात्तव,बेटी बचाव बेटी पढाव सेलच्या संयोजक पदी रेणुकाताई घोडेस्वार ,दिव्यांग सेलच्या संयोजक पदी निलेश पाझारे ,बुद्धिजीवी सेलच्या संयोजक पदी सचिन निंबाळकर ,अभियंता सेलच्या संयोजक पदी सुनील मीलाल, यांची निवड करण्यात आली आहे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा महानगर चंद्रपूर जिल्हाध्यक्ष राहूल पावडे, चंद्रपूर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष हरिश शर्मा, आमदार किर्तीकुमार भांगडीया, आमदार रामदास आंबटकर, माजी आमदार प्रा. अतुल देशकर, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी आ. अॅड. संजय धोटे, माजी आ. सुदर्शन निमकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंहजी चंदेल, प्रमोदभाऊ कडू, चंद्रपूर जिल्हा महानगर महामंत्री प्रज्वलंत कडू, सुरज पेदुलवार, रामपाल सिंग, किरण बुटले, विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस, प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्काताई आत्राम, माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी, भाजपा नेते अशोक जीवतोडे, भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत, खुशाल बोंडे, राजेंद्र गांधी,तुषार सोम,प्रकाश धारणे,अरुण तिखे,सविता कांबळे, विशाल निंबाळकर, मनोज पोतराजे, धम्मप्रकाश भस्मे, धनराज कोवे,चाँद पाशा सय्यद, रवी चहारे, संदिप आगलावे, सचिन कोतपल्लीवार, दिनकर सोमलकर, रवी लोनकर, पुरुषोत्तम सहारे, आदींनी अभिनंदन केले आहे.

सह्याद्रीचा राखणदार




# शासनाच्य बांधकाम कामगार योजने मुळे मजुराचा मुलगा बनणार डॉक्टर

## 'शासन आपल्या दारी' योजना मुळे लाभार्थ्यांची होतेय स्वप्नपूर्ती

**हिंगोली । प्रतिनिधी**

हिंगोली येथे शासन आपल्या दारी कार्यक्रम मध्ये बांधकाम कामगारांनी आपले मनोगत व्यक्त केली त्यावेळी बोलताना म्हणाले की माझ्या मुलाला आम्हाला शिकवण्याची इच्छा नव्हती. कारण आम्ही मिस्त्री काम करतो. त्यामुळे मुलाला शिकवायचे कसे, असा आमच्यासमोर प्रश्न होता. शासनाच्या नोंदणीकृत बांधकाम मजुरांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती योजना मिळते. या योजनेतून आम्हाला आमच्या मुलाचे शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करता येते आहे, याचे मनोमन समाधान आहे. शासनाने या योजनेचा लाभ आम्हाला दिल्यामुळे माझा मुलगा आता रत्नागिरी येथे डॉक्टर होण्यासाठीचे शिक्षण घेत आहे. मी शासनाचे आभार मानते, असे हिंगोली जिल्हयातील औंढा तालुक्यातील वसईच्या अशाबी चाँदसबा शेख म्हणाल्या. अशाबी यांच्यासारख्या अन्य लाभार्थ्यांनीही शासनाचा लाभ एकाच छताखाली मिळाल्याने आमची स्वप्नपूर्ती होत असल्याचे सांगत समाधान व्यक्त केले.रामलीला मैदानावर शासन आपल्या दारी कार्यक्रमांतर्गत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते प्रातिनिधिक स्वरूपात विविध योजनांच्या लाभाचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील खेड्यापाड्यातून बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.मी साधी गृहिणी. शंभर शंभर रूपये जमा करून आम्ही बचतगट तयार केले. यामध्ये सातत्य ठेवले. जात्यावर आम्ही दाळ करत. या व्यवसायासाठी मानव विकास कार्यक्रमामधून पाच लाख ४० हजार रूपये मिळाले. त्यातून आमच्या चार दाल मिल मालकीच्या झाल्या आहेत. यातून आमच्या महिला आता आर्थिक सक्षम होत आहेत. शासनाने या व्यवसायासाठी आम्हाला मार्गदर्शन करून सक्षम केल्याबद्दल पार्डाच्या रेखा जहिरव यांनीही शासनाचे आभार मानले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळांतर्गत ट्रॅंक्टर मिळाले. या ट्रॅक्टरमुळे शेतीची कामे करणे अधिक सुलभ होणार आहे. मुख्यमंत्री साहेबांच्याहस्ते आज ट्रॅक्टरची चावी मिळाल्याने अत्यानंद झाला, मी शासनाचा आभारी आहे, असे सेनगावचे चंद्रकांत टवले म्हणाले.ग्रामीण भागातील दिव्यांगांना दुर्धर आजारावरील उपचारासाठी या अभियानात लाभ देण्यात आला. लाभ मिळालेल्या कळमनुरी तालुक्यातील सिनगीच्या दिव्यांग रेणुका मगर म्हणाल्या, शासनाचा २५ हजारांचा मला धनादेश मुख्यमंत्री यांच्या हस्ते



आज मिळाला. शासन गोरगरिबांच्या दारापर्यंत विविध योजना पोहोचवत आहेत, याबद्दल मी शासनाचे आभार मानते.मी सध्या अकरावीमध्ये शिकते. आयआयटीमध्ये शिकण्याची माझी इच्छा आहे. त्यासाठी आवश्यक तयारी करण्यासाठी मला आज शासन आपल्या दारी कार्यक्रमात मुख्यमंत्री यांच्या हस्ते टॅब मिळाला. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने 'महाज्योती'मार्फत मला हा लाभ मिळाला. यासोबत एक सीमकार्डही देण्यात आले आहे. या माध्यमातून मला आयआयटी पूर्वतयारीसाठी क्लासेस ऑनलाईन पाहणे, विविध टेस्ट सिरीज सोडविता येणार आहेत. त्यामुळे माझे आयआयटीचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार आहे. ही बाब माझ्यासाठी अतिशय आनंददायी ठरेल, असे कळमनुरी येथील सावता विठ्ठल गाभणे या विद्यार्थ्याने सांगितले.स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी प्रयत्न करीत असलेल्या हिंगोली येथील सतीश तुकाराम टापरे यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून ५० लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या १७ लाख ५० हजार रुपयांच्या अनुदानाचा धनादेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते टापरे यांना शासन आपल्या दारी कार्यक्रमात सुपूर्द करण्यात आला. या योजनेचा लाभ मिळाल्यामुळे माझे इलेक्ट्रिकल साहित्य निर्मिती उद्योगाचे स्वप्न साकार झाले. हिंगोली येथील एमआयडीसीमध्ये माझा उद्योग सुरु झाला आहे. यामध्ये रोहित्र, वीज वितरण उपकरणे यासारख्या साहित्यांची निर्मिती केली जात आहे. यामाध्यमातून आणखी १५ जणांना रोजगार मिळाला आहे, असे श्री. टापरे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले.हिंगोली शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या अर्चना किशन भगत यांनाही मुख्यमंत्री यांच्या हस्ते टूल कीटचे वितरण करण्यात आले. आपण मुलभूत सौंदर्यशास्त्र विषयाचे प्रशिक्षण असून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर मला स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी हे टूल कीट उपयुक्त ठरेल. यामुळे मी माझा स्वयंरोजगार सुरु करू शकणार आहे, असे अर्चना यांनी सांगितले.

---

### अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या

## नामांकीत निवासी शाळांमध्ये प्रवेशा साठी अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी । प्रतिनिधी**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात हिंगोली व परभणी या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला- मुलींना इयत्ता १ ली व २ री मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देणे बाबत प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत जोडावी. विद्यार्थी दारिद्रय रेषेखालील असेल तर त्यासंबंधीत छायांकित प्रत व दारिद्रय रेषा अनुक्रमांक नमुद करावा. पालकाची उत्पन्न मर्यादा ही १ लाख रुपये एवढी असुन यासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत वैधता असणारे उत्पन्न प्रमाणपत्र जोडण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा तसेच इयत्ता २ री साठी बोनाफाईड प्रमाणपत्र सोबत जोडावे, रहिवाशी प्रमाणपत्र व वैद्यकीय अधिकारी यांचे विद्यार्थी निरोगी असल्याचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा, घटस्फोटीत, निराधार व दारिद्रय रेषेखालील कुंटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल तसेच विद्यार्थ्यांचे पालक शासकीय/ निमशासकीय नोकरदार नसावेत. प्रकल्प कार्यालयात दि. ५ एप्रिल पासून प्रवेश अर्ज विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.या योजने अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर होणारा संपुर्ण खर्च आदिवासी विकास विभाग करणार आहे. योजनेचा लाभ घेणेसाठी, प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी जि. हिंगोली येथे संपर्क साधावा तसेच अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यास शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत प्रवेश घेण्यासाठी परिपूर्ण प्रवेश अर्ज दि. ३० एप्रिल, २०२४ पर्यंत सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी सुनिल बारसे यांनी केले आहे.

---

## मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते मुलींच्या वसतिगृहाचे भुमीपुजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते अंबाजोगाई येथे उभारण्यात येणाऱ्या मुलींच्या वसतिगृहाचे भुमीपुजन करण्यात आले. सदरील वसतिगृहासाठी दत्ताआबा पाटील यांनी मोफत जागा उपलब्ध करून दिली आहे.

अंबाजोगाई शहरातील रिंग रोडवरील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या श्री मुकुंदराज प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या परीसरात हे मुलींचे वसतिगृह उभारण्यात येणार आहे. या वसतिगृहासाठी दत्ताआबा पाटील यांनी जमीन उपलब्ध करून दिली आहे.हा भुमीपुजन कार्यक्रम १४ मार्च रोजी सकाळी १० वाजता विधीवत संपन्न झाला. या कार्यक्रमास अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन दत्तात्रय ज्ञानोबा पाटील, बीड जिल्हा



परिषदचे माजी सभापती राजाभाऊ औताडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अमर देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख, शिवसेनेचे मदन परदेशी, प्रख्यात -हृदयरोग तज्ञ डॉ. गोपाळ पाटील, प्रा. सुलभा सोळुंके, मुकुंदराज उच्च विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब माने, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुनिता धायगुडे, पत्रकार अमोल लोमटे, कल्याण भिसे, दुष्यंत लोमटे, यांच्या सह शाळेतील सर्व सहशिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## कौसडी येथील काँग्रेसचे ग्रा.पं.सदस्य अन्वर पटेल यांच्यासह कार्यकर्त्यांचा रा.काँ.पार्टी शरद पवार गटात प्रवेश



**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील काँग्रेसचे ग्रामपंचायत सदस्य व इतर कार्यकर्त्यांचा दिनांक १४ मार्च गुरुवार रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटात माजी आमदार विजय भांबळे यांच्या उपस्थितीत प्रवेश करण्यात आला.

कौसडी येथील काँग्रेसचे ग्रामपंचायत सदस्य अन्वर पटेल, बाबू पटेल, गबरू पटेल, फकरू पठाण,राजू पटेल भाजपाचे महेबूब खान पठाण यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गटात माजी आमदार विजय भांबळे यांच्या उपस्थितीत प्रवेश करण्यात आला आहे.

यावेळी माजी सरपंच यशवंतराव देशमुख माजी पंचायत समिती सदस्य लिंबाजीराव इखे अरविंदराव देशमुख, शौकत लाला, शेख बिलालोद्दीन, मधुकर बहिरट, हरिभाऊ खैरे, समीर पठाण, तुळशीराम सावळे, शेख असलम, ऋषिकेश देशमुख हे उपस्थित होते.

---

## मंडळाधिकारी जगन्नाथ बीडवे यांना बे दम मारहाणीच्या निषर्धात महसूल कर्मचार्यांचे लेखनी बंद आंदोलन सूरूच

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत येथिल मंडळ अधिकारी श्री. बिडवे जे.डी. यांच्यावर वाळुमाफियांनी केलेल्या भ्याड हल्या ने संपूर्ण जिल्हा भयभित झाला असून त्यामूळे महसूल कर्मचार्यांनी लेखनी बंद आंदोलन दिनांक १४ मार्च पासून जिल्हासह तालूक्यात सूरू केले आहे.

सविस्तर वृत्त असे की,मानवत तालुका मंडल अधिकारी श्री.बिडवे जे.डी. अहो तारीख १३/०३/२०२४ रोजी अवैध रित्या गौण खनिज उत्खन्न व वाहतुक रोखणे कामी मौ केकरजवळा येथे गस्त घालत असताना वाघाळापाटी कडुन एक ट्रक येताना दिसला सदर ट्रकचा पासींग क्र. चक ४० ध १७९५ असा होता सदर ट्रक चालक हा अवैधरित्या वाळु वाहतुक करत असताना दिसुन आल्यामुळे सदर ट्रक जप्त करुन तहसिल कार्यालय मानवत येथे लावण्यात आला. सदर ट्रक चालकाचे नाव सचिन बालासाहेब पाटील रा. मुदगल असे आहे असे ट्रक चालकाने सांगितले. सदर बाबीचा राग मनात धरुन सदर दिवशी दुपारी १.४५ मी. मंडळ अधिकारी श्री.



बिडवे जे.डी. साहेब तलाठी श्री. गोरे बाबासाहेब हे पिक पेरा व संचिका तपसणी साठी तहसिल कार्यालयातुन तलाठी कार्यालयात जात असताना तहसिल कार्यालयाच्या गेटवर त्यांना श्री. विठोबा मारोती घाटगे रा. मुदगल व श्री. लक्ष्मीकांत शेषेराव तिडके रा. मुदगल यांनी सदर वाहन का पकडले तुम्हाला वाहन पकडायचा अधिकार आहे का? असे म्हणत श्री. विठोबा मारोती घाटगे यांनी त्यांच्या हातामधील कोणती तरी वस्तु तोंडावर मारली तसेच लक्ष्मीकांत तिडके यांनी श्री. बिडवे यांच्या पोटात लाथाबुक्यांनी मारहण केली. संबंधितावर पोलिस स्टेशन मानवत येथे गु.रु. ३५३, ३३३,५०४,५०६ व ३४ या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप ही गुन्हा दाखल होवुन संबंधितांना अटक करण्यात आलेली नाही. करिता याव्दारे निवेदन देण्यात येते कि, जो पर्यंत गुन्हेगारांना अटकहोत नाही. तोपर्यत परभणी जिल्हातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी हे नैसर्गिक आपत्ती व निवडणुक विषयी कामे वगळून कामबंद अंदोलन करत आहोत. अवैध उत्खनन गस्त घालणे व काम यापुढे संपुर्ण जिल्हातील तलाठी व मंडळ अधिकारी करणार नाहीत असा ईशारा महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्या वतीने देण्यात आल्याने दिंनाक १४ मार्च पासून परभणी जिल्हासह मानवत तालूक्यातील ४ मंडळातील मंडळाधिकारी यांच्या सह १७ तलाठ्यांनी आपल्या सज्जातील लेखनी बंद आंदोलन सूरू केले आहे, आंदोलनाचा ३ रा दिवस उजाडला आहे.

---

# यशवंतरावांसारख्या सुसंस्कृतपणा आजच्या राजकारणात दिसत नाही-दगडू लोमटे

**अंबाजोगाई/ देवराष्ट्रे**

आदर्श राजकिय नेता , रसिक साहित्यिक , विज्ञानवादी विचारवंत , संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार असे अष्टपैलू यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र आणि भारताचे भाग्यविधाते होते. पहिले मुख्यमंत्री म्हणून दोन वर्षाच्या कालावधीत विविध योजना व धोरणांच्या माध्यमातून केलेल्या भक्कम पायाभरणीवर आजही महाराष्ट्र ताठ मानेनं उभा आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता यशवंतरावांचा सुसंस्कृतपणा काही मोजकी लोकं सोडली तर आजच्या राजकारणात दिसत नाही , अशी खंत साहित्यिक दगडू लोमटे ( अंबाजोगाई ) यांनी यशवंत कवी संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना व्यक्त केली. देवराष्ट्रे ( ता. कडेगाव ) येथे यशवंतराव चव्हाण यांच्या १११ व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान , मुंबई केंद्र- देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने जन्मघर स्मारकात आयोजित १० व्या यशवंत कवी संमेलनात लोमटे बोलत होते. आमदार अरुणअण्णा लाड यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमापूजनाने संमेलनाचे उदघाटन झाले. मराठवाड्यातील कवी प्रभाकर साळेगावकर ( माजलगाव), राजेसाहेब कदम (अहमदपूर ) , प्रांताधिकारी रणजीत भोसले, तहसीलदार अजित शेलार, कार्यकारी अभियंता राजन डवरी,गटविकास अधिकारी प्रशांत राऊत,विस्तार अधिकारी सुनील लोहार ,सरपंच निर्मला बोडरे , उपसरपंच डी. एस.कुंभार आदी प्रमुख उपस्थित होते.

लोमटे म्हणाले , मराठवाडा आणि सांगलीचे वेगळे ऋणानुबंध आहेत. क्रांतिसिंह नाना पाटील यांना बीड जिल्ह्याने निवडून दिले होते. अंबाजोगाई येथे भगवानराव लोमटे बापू यांनी तीन दिवसीय यशवंत स्मृती समारोह सुरू केला तो बीड जिखतील अंबाजोगाई येथे. स्वातंत्र्य पूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात येथील यशवंतराव चव्हाण , क्रांतिसिंह नाना पाटील , जी.डी. बापू लाड यांचे मोठे योगदान आहे. आधुनिक महाराष्ट्र घडविणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मघरात होणाऱ्या संमेलनाच्या




अध्यक्षपदाची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. आ.अरुणअण्णा लाड म्हणाले , गेली १० वर्षे मराठवाड्यातील साहित्यिक देवराष्ट्रेत येवून साहित्यसेवा घडवीत आहेत. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. हे संमेलन गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्सव म्हणून साजरे करावे. या मातीतून लेखक , कवी घडावेत. प्रभाकर साळेगावकर म्हणाले, यशवंतरावांच्या जन्मघरातील या संमेलनाने आम्हाला वेगळी ऊर्जा मिळते , लिहण्याचं बळ मिळते. हे संमेलन अखंडित सुरू राहील.दुपारच्या सत्रात कवी संमेलन झाले. ख्यातनाम कवी प्रभाकर साळेगावकर यांचे विडंबन आणि राजेसाहेब कदम यांच्या बहारदार सूत्रसंचालनाने रंगत वाढली.सु. धों. मोहिते , रमजान मुल्ला , आनंदहरी , एम. बी. जमादार , जयवंत आवटे ,हिंमत पाटील, सदानंद माळी , प्रा . विश्वनाथ गायकवाड , रघुराज मेटकरी , ऍड. सुभाष पाटील , संदीप यादव , संदीप नाझरे , दीपक पवार , अशोक पवार , विनायक कुलकर्णी , सुनीता कुलकर्णी , सुमुदा सुर्वे , डॉ. राहुल गौर , धर्मवीर पाटील , उत्तम सावंत , सुवर्णा जगताप , अनिल पाटील ,सुनिल गुरव , तुकाराम पवार यांच्यासह अनेक कवींनी सादर केलेल्या कवितांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले . स्वागत व प्रास्ताविक दत्तात्रय सपकाळ यांनी केले. आभार दीपक शिंदे यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय दीपक पवार यांनी केला. प्रतिष्ठानचे प्रदीप मोहिते , संतोष होनमाने , मयूर काळे यांनी संयोजन केले.

# हिंगणघाट शहरातील माता मंदिर व काजी वॉर्ड येथील असंख्य युवा व महिला कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

## आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा तसेच महीला कार्यकर्त्यांनी आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.दि. १५ रोजी स्थानिक माता मंदिर व काजी वॉर्ड येथील बहुसंख्य युवा तसेच महिला कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन दि. १५ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले. याप्रसंगी प्रामुख्याने वीनस मुन , चंद्रकांत गेडाम, मिलिंद जांगडे, सौरभ भजभूजे, रणजीत राऊत, लोकेश मदनकर, अनुप पुनासे, सार्थक बलवीर, संदेश भगत, साहिल कांबळे, अश्वदीप मेंढे ,आदर्श जोडांगडे, सुनील ओरके, संदीप पाटील, तन्मय माहुरे, तुषार कोल्हे, निखिल कोरापे, यश लोणकर, वीरेंद्र मसराम, स्वयंम भगत, दिव्यांशु ढोक,अमर सुनके, कृणाल धुल, यश लाटकर ,निशांत पाल ,तुषार काळे ,हर्ष तराळे, वेदांत कोल्हे, रोहन तीमासे, ओम विधाते, कृष्णा हिवसे, प्रज्वल फुलवटकर, सारंग पाटील, तेजस आंबटकर, मेघराज उदासे, सक्षम मोरे, अजय पांडे ,महेश वारणे, अभिषेक मडकाम ,विजू ठाकरे, नैतिक मोरे, समीर महाजन, संदीप पाटील, सुनील ओरके, संदेश बरडे ,विवेक टेकाम ,ओम नागरे, आशाताई आत्राम, मालाताई मडावी, हेमलता उईके, कमलाबाई आत्राम, मयुरी पाटील, जोशना पाटील, छायाबाई दहिवलकर, वर्षा निमजे, भिमाबाई , कोमल फुलझेले, ज्योती पाटील , नीतू काळबांडे ,बबीता मेंढे, किरण ओरके, कविता चारबे ,नंदिनी ठोंबरे ,वर्षा पोटे, चंदाबाई कातरे , दुर्गा कातरे ,सविताबाई खेकरे , गोदावरी ढेकरे, कोमल थेटे, सोनू आत्राम, दुर्गा सुरजुसे ,प्रियंका खैरे, स्वाती इटनकर ,निधी इटणकर, भारती चिंचोलकर, योगिता वराडे, करिष्मा नासरे, अस्मिता खैरे, सरोज कांबळे, सीमा वायजोडे ,सोनू वायजोडे, छाया वायजोडे ,अर्चना वायजोडे, अंकिता वायजोडे, पल्लवी सुपारे , नीतू मेश्राम , सुवर्णा पेंदोर, तनुश्री झिलपे, पोर्णिमा थूल , मायाबाई बोधिले, सुशीला कांबळे, आशाबाई थूल , प्रिया पेंदोर , वंदनाबाई कामडी, पुष्पा ठाकरे ,रेखा कामडी, लता जीकरे, शोभा निकुरे, किरण निकुरे, मंजू खानखोजे, सुमन जोगदंड, अनिता खेडेकर, वैशाली राजुरकर, नलिनी राजुरकर, बेबी सहापायले




,मोनिका वरघने , निर्मला वरघने ,ललिता सातपुते, जनाबाई चापले ,कविता कुडमेथे, रवीला मेश्राम, सीमा मेश्राम, शीला कुडमेथे,अश्विनी कुडमेथे, प्रिया मसराम, चिकाटी कुडमेथे, फुलाबाई कुडमेथे, लताबाई कुडमेथे ,कल्पना कोवे ,कांताबाई कुडमेथे ,शोभा मडावी, कुसुम कुडमेथे, रजनी देहारे, श्रुती कुडमेथे,नीलिमा मसराम, मायाबाई कोवे ,कविता कुडमेथे, सारिका सिडाम, सारिका मसराम, प्रभा कुडमेथे,जनाबाई मसराम, भारती कोवे ,मनोज टेकाम ,कार्तिक कुमरे, मिहाल गायकवाड, मयूर कुडसंगे, राहुल दांडेकर, तेजस येनोरकर, दर्शन कदम, मोहित शिंदे, आदित्य मडके, रोहित भगत, युवराज मरुस्कर ,जुबेर शेख ,फिरोज खान, साहिल कडू, प्रियांशू फरकाडे, प्रज्वल बोबडे, रफिक शेख, अजिंक्य चौधरी, संकेत हिंग, अनिकेत वानकर, शिव कुटे , कृणाल चाफले, ऋतिक कडू, सुरज चाफले, योगेश नरड, वैभव यालगंटवार, चेतन धेटे , प्रतीक ढाकरे, वैभव गेडाम, तिजारे, मनीष, रहीम खान, अक्षय देवडे ईत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त सोहळा आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोरभाऊ दिघे, भा. ज. युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर, जिल्हा महामंत्री भाजपा आकाश पोहाणे, हिंगणघाट ग्रामीण भाजपा तालुकाध्यक्ष विनोद विटाळे ,आदिवासी आघाडी जिल्हाध्यक्ष शंकर आत्राम, भाजपा समुद्रपूर तालुका अध्यक्ष वामन चंदनखेडे, विधानसभा प्रमुख संजय डेहणे, भाजपा शहराध्यक्ष भूषण पिसे , युवा मोर्चा शहराध्यक्ष सोनू पांडे, भाजपा महिला शहराध्यक्ष रवीला आखाडे, भाजपा महिला विधानसभा प्रमुख नलिनी सयाम ,मोनिका कापसे, अमोल त्रिपाठी, दिनेश वर्मा, मुन्ना त्रिवेदी, स्वप्निल सुरकार, तुषार येनोरकर, सचिन मोरे, भारतीय जनता युवा मोर्चा तालुका महामंत्री ओम भोमले,भारतीय जनता युवा मोर्चा विधानसभा प्रमुख अक्षय थूटे, सारिका जांभुळे, खुशाल चले , इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

# भाजपा जनहितासाठी काम करणारा पक्ष–ना.मुनगंटीवार

## गोंडपिपरी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

भाजपा हा जनहितासाठी काम करणारा पक्ष असून काँग्रेस हा केवळ रडणारा पक्ष आहे, असे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्य, वन व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. गोंडपिपरी येथे नगरोत्थान अभियानांतर्गत ३ कोटी ३२ लाख रूपयांच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजन प्रसंगी उपस्थिताना मुंबईवरून दूरदृष्यप्रणालीद्वारे संबोधित करताना ते बोलत होते.



कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा,राजुरा विधानसभा प्रभारी देवराव भोंगळे,माजी आमदार संजय धोटे, सुदर्शन निमकर, शिवसेना जिल्हाप्रमुख बंडु हजारे, प्रदेश महामंत्री महिला आघाडी अल्काताई आत्राम,भाजपा तालुका अध्यक्ष बबन निकोडे,शहर अध्यक्ष चेतनसिंह गौर, महिला शहर अध्यक्षा अरुणा जांभूळकर,ज्येष्ठ नेते सुहास माडुरवार, दीपक सातपुते, अमर बोडलावार, महेंद्रसिंह चंदेल, राकेश पून, प्रशांत येल्लेवार, नगरसेविका मनीषा मडावी, मनीषा दुर्योधन, आश्रिवनी तोडासे, शारदा गरपेल्लीवार,चौधरी गुरुजी आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, गोंडपिपरीच्या जनतेने नेहमी प्रेम दिले आहे. काँग्रेस सत्तेत असताना निधी आणण्यास अपयशी ठरली. मात्र भाजपाने राज्यात सरकार आल्यावर अत्यंत कमी कालावधीत विकासकामांच्या योजना मंजूर करण्यात आल्या. विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वात भाजपा दूरवरच्या भागातही विकास पोहोचवित आहे.राज्य शासनाने महिलांसाठी विविध योजना राबविल्या आहेत. बस तिकिटात महिलांना ५० टक्के सवलत राज्यशासनाने दिली आहे. आंगणवाडी सेविकांच्या मानधनातही भरघोस वाढ करण्यात आली आहे. आपण लवकरच गोंडपिपरीच्या जनतेचे दर्शन घेण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी येणार आहोत असेही ना. मुनगंटीवार म्हणाले. यापूर्वी गोंडपिपरीत तालुक्यातील धाबा येथे श्री संत परमहंस कोंडय्या महाराज देवस्थान सभागृह उभारण्यासाठी ९७ लक्ष ८३ हजार रुपयांचा निधी मंजूर केला. त्याप्रमाणे गोंडपिपरी शहराच्या विकासाकरिता २० कोटी रुपये देऊन ना. मुनगंटीवार यांनी वचनपूर्ती केली. आता शहराच्या विकासासाठी एकूण ३ कोटी ३२ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. गोंडपिपरी तालुक्यातील अनेक गावांना आपण गावाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. गोंडपिपरी तालुक्याच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही ना. मुनगंटीवार यांनी यावेळी दिली.

# स्मिता शिंदे या आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित



**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने दरवर्षी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना सन्मानित करण्यात येत असते. यावर्षी तालुकास्तरीय आदर्श शिक्षिक पुरस्काराचे वितरण सांगोला तालुक्याचे आमदार मा .शहाजी बापू पाटील यांच्या हस्ते व दीपक आबा साळुंखे पाटील. गटविकास अधिकारी आनंद लोकरे गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, वाढेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख मठ्ठपती व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बुंजकर वस्ती या ठिकाणी त्या कार्यरत असणाऱ्या स्मिता दीपक शिंदे या शिक्षिकेस सदर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या अगोदर जिल्हा परिषद हजारेवाडी नंबर २ या ठिकाणी त्यांनी उत्कृष्ट कार्य केलं आहे. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल म्हणून त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाझरा विद्यामंदिर प्रशाला येथील मुख्याध्यापक अमोल लक्ष्मण गायकवाड यांच्या सुविद्य पत्नी आहेत. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# हिंगणघाट शहरातील शेकडो कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

## आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते तसेच महीला आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.

दि. १५ रोजी हिंगणघाट शहरातील बहुसंख्य युवा कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन काल दि. १५ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने रोशन डागा, अनुप कोठारी , विवेक लोढा, मयूर बैद ,महेंद्र कासवा, राजेश शर्मा, मनोज कासवा, अनुज कोचर, रवींद्र गोडे, अरुण काचोळे, मंगेश चवडे , अतुल वडमलवार, प्रशांत बोरकर, प्रकाश रेडलावार , रवींद्र मुक्कावार, घनश्याम जवादे, बन्सीलालजी , किरण भोयर , जितू शर्मा, ऋषभ बाळबुधे , साहिल तिमांडे, कैलास मेश्राम, प्रकाश भोयर, मयूर लोढा, मोहित नाहर, पियुष घिया , नवल मानधनिया, अविनाश हांडे, शुभम नंदुरकर, अमित कासवा, पियुष मुनोत ईत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, भा. ज. युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर, जिल्हा महामंत्री भाजपा आकाश पोहाणे, हिंगणघाट ग्रामीण भाजपा तालुकाध्यक्ष विनोद विटाळे ,आदिवासी आघाडी जिल्हाध्यक्ष शंकर आत्राम, भाजपा समुद्रपूर तालुका अध्यक्ष वामन चंदनखेडे ,विधानसभा प्रमुख संजय डेहणे, भाजपा शहराध्यक्ष भूषण पिसे , युवा मोर्चा शहराध्यक्ष सोनू पांडे, भाजपा महिला शहराध्यक्ष रवीला आखाडे, भाजपा महिला विधानसभा प्रमुख नलिनी सयाम ,मोनिका कापसे, अमोल त्रिपाठी, दिनेश वर्मा, मुन्ना त्रिवेदी, स्वप्निल सुरकार, तुषार येनोरकर, सचिन मोरे, भारतीय जनता युवा मोर्चा तालुका महामंत्री ओम भोमले,भारतीय जनता युवा मोर्चा विधानसभा प्रमुख अक्षय थूटे, सारिका जांभुळे, खुशाल चले , इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

# कार्यकर्त्यांनी संभ्रमात राहू नये; मी मोहोळ विधानसभा निवडणुक लढविणारच

**मोहोळ –** कोणी कितीही अफवा पसरविल्या तरी ही मी मोहोळ विधानसभा मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढविणारच, कार्यकर्त्यांनी संभ्रमात राहू नये, गेल्या काही दिवसा पासून माझ्या वैयक्तिक कामामुळे मी मोहोळला येऊ शकलो नाही. मोहोळ सोडून कुठल्याही विधानसभेचा विचार माझ्या डोक्यात नाही. लोकसभेच्या अंतिम टप्प्यात आपण आपली राजकीय भूमिका स्पष्ट करणार असल्याचे प्रतिपादन मोहोळचे माजी आमदार रमेश कदम यांनी केले. दरम्यान आपण कुठल्याही निर्णय घ्या आम्ही तुमच्या पाठीशी असल्याचा सूर उपस्थीत जनतेतून ऐकावयास मिळाला.येथील लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार कदम यांच्या कार्यकर्त्यांनी विचार विनिमय व स्नेह



मेळावा आयोजित केला होता त्यावेळी ते मार्गदर्शन करीत होते. यावेळी अनेकांनी आपण घ्याल तो निर्णय शिरसावंध्य असल्याचा निर्धार व्यक्त केला.माजी आमदार कदम पुढे म्हणाले, मी आमदार झाल्यानंतर केवळ आठ महिनेच मला काम करण्याची संधी मिळाली पण मी आठ वर्षांनंतर ही मोहोळ आल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांनी त्याची जाण ठेवली. मोहोळची जनता ही काम करणाऱ्यांवर प्रेम करते हे यापूर्वी त्यांनी दाखवून दिले आहे. गावागावात संपर्क ठेवा, येत्या काळात ही मागेल त्याला पाणी मागेल त्याला रस्ता हे काम सुरू करणार असल्याचे ही माजी आमदार कदम यांनी सांगितले.दरम्यान सध्या शेतकरी मोठ्या अडचणीत आहे, शेतकऱ्यांच्या व्यथा खासदार शरद पवार यांना चांगल्या माहिती आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे अडचणीचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण खासदार पवार यांच्या गटातूनच निवडणूक लढवावी असे मनोगत चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रदिप निर्मळ यांनी व्यक्त केले. त्यावेळी जमलेल्या कार्यकर्त्यांनी त्याला टाळ्याच्या गजरात मोठी साथ दिली.यावेळी जयपाल पवार, शशीकांत कसबे,आबा कांबळे, कड्याप्पा पवार, रेणुका सोनवणे, धनाजी वाघमारे, स्वाती माने, मुक्ता खंदारे, सुशांत देवकुळे, श्री कांबळे, प्रमोद खंदारे, नामदेव काळे, यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी नागेश खिलारे सुधीर खंदारे, संतोष बिराजदार, सचिन भिसे, धनाजी वाघमारे, चेतन सकट, पप्पू पवार, कृष्णा जाधव, उमेश वाघमारे, पूजा खिलारे, कविता ढोबळे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोलापूरच्या अपूर्ण सिंचन प्रकल्पांसाठी कर्ज घेण्यास मान्यता; एकरुख, शिरापूर, आष्टी व बार्शी प्रकल्प

**सोलापूर :**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांसाठी सात हजार ५०० कोटींचे कर्ज घेण्यास मान्यता दिली आहे. यात सोलापूर जिल्ह्यातील एकरुख, शिरापूर, आष्टी व बार्शी या उपसा सिंचन योजनांसह ७५ प्रकल्पांचा समावेश आहे. त्यांच्या उर्वरित कामांसाठी यातील पाच हजार कोटी रुपये मिळणार आहेत.राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प मार्गी लावण्यासाठी नाबार्डकडून १५ हजार कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात त्यापैकी सात हजार ५०० कोटींचे कर्ज घेण्यास राज्य सरकारने सोमवारी (ता. ११) मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली आहे.नाबार्डकडून मंजुरीनंतर यातून सोलापूर जिल्ह्यातील चार उपसा सिंचन योजनांसह ७५ अपूर्ण प्रकल्पांना पाच हजार कोटी रुपये मिळणार आहेत. तर उर्वरित दोन हजार ५०० कोटी रुपये १५५ सिंचन प्रकल्पांच्या कालवे व वितरण प्रणाली सुधारण्यासाठी देण्यात येणार आहेत.दरम्यान, जिल्ह्यातील एकरुख, शिरापूर, आष्टी या तीनही उपसा सिंचन योजनांची कामे बऱ्यापैकी पूर्ण झाली आहेत. मात्र, वितरण व्यवस्थेची कामे सुरू आहेत. बार्शी उपसा सिंचन योजनेची वितरणव्यवस्थेची कामे सुरू असली तरी ती पूर्ण होण्यास जून २०२५ पर्यंतचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. एकरुख, शिरापूर, आष्टी या योजनांसाठी आणखी ४० ते ५० कोटी तर बार्शी योजनेसाठी आणखी २०० कोटींची आवश्यकता होती. या प्रकल्पांसाठी राज्य सरकारने नाबार्डकडून कर्ज घेण्यास मान्यता दिल्याने ते मार्गी लागतील.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .